## थोडक्यात...

### कमी पावसातही भरघोस उत्पादन आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करा:- संजय लोंढे

(बाळासाहेब ढेरे /दै.धर्मयोध्दा)

**घनसावंगी-** खरीप हंगाम २०२६ च्या पार्श्वभूमीवर कृषी विभागामार्फत कोठाळा बु. येथे खरीप हंगामपूर्व जनजागृती व प्रात्यक्षिक कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. यावेळी उप कृषी अधिकारी संजय लोंढे यांनी शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, शाश्वत शेती पद्धती तसेच कमी खर्चात अधिक उत्पादन घेण्यासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. या वर्षी एल निनोच्या प्रभावामुळे पावसाचे प्रमाण कमी राहण्याची शक्यता असल्याने शेतकऱ्यांनी बीबीएफ पद्धतीवर पेरणी, उताराला आडवी पेरणी तसेच जलसंधारणाच्या उपाययोजनांचा अवलंब करणे आवश्यक असल्याचे संजय लोंढे यांनी सांगितले. या पद्धतीमुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरते, मातीची धूप कमी होते व कमी पावसातही पिकांना आवश्यक ओलावा टिकून राहण्यास मदत होते, असे त्यांनी स्पष्ट केले.

सोयाबीन पेरणीपूर्वी बियाण्याची उगवण क्षमता तपासणी व बीज प्रक्रिया करणे अत्यंत आवश्यक असल्याचे सांगत त्यांनी ट्रायकोडर्मा, अझोटोबॅक्टर व पीएसबी यांसारख्या जैविक घटकांच्या वापराचे महत्त्व पटवून दिले. या घटकांमुळे जमिनीची सुपीकता वाढण्यास मदत होत असून रासायनिक औषधांवरील खर्च कमी होतो, असे त्यांनी नमूद केले. ऊस पाचट जाळण्याऐवजी त्याचा शेतात आच्छादन म्हणून वापर केल्यास जमिनीतील ओलावा टिकून राहतो, तणांचे प्रमाण कमी होते व सेंद्रिय कार्बन वाढण्यास मदत होते, अशी माहितीही त्यांनी दिली. यावेळी सहाय्यक कृषी अधिकारी किरण घादगिणे यांनी फळबाग लागवडीसाठी सीआरए तंत्रज्ञान, शून्य मशागत, सापळा पिकांची लागवड, हिरवळीच्या खतांचा वापर तसेच जीवामृत व बीजामृत यांच्या प्रभावी वापराबाबत माहिती दिली. तसेच शंखी गोगलगाय नियंत्रणासाठी चिकट सापळे, पक्षी थांबे व ट्रायकोडर्माचा वापर ही एकात्मिक किड व्यवस्थापनातील प्रभावी साधने असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमास परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून स्वातंत्र्यवीर सावरकर यांना अभिवादन



**नवी दिल्ली-** स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस दिल्ली येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुष्पांजली अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

यानंतर कोपरनिकस मार्गस्थित महाराष्ट्र सदनातील सभागृहात आयोजित कार्यक्रमात महाराष्ट्र शासनाच्या निवासी आयुक्त तथा सचिव आर. विमला यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी विशेष आयुक्त श्वेता सिंघल, महाराष्ट्र परिचय केंद्राचे संचालक हेमराज बागुल, सहायक निवासी आयुक्त स्मिता शेलार, जनसंपर्क अधिकारी मनीषा पिंगळे, सहायक लेखाधिकारी निलेश केदारे, व्यवस्थापक प्रमोद कोलापटे यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही प्रतिमेस पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी चर्चा



**नवी दिल्ली-** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नवी दिल्ली येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सदिच्छा भेट घेतली. या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी राज्याच्या विकासाच्या विविध प्रकल्पांबाबत पंतप्रधानांशी चर्चा केली.

या भेटीदरम्यान मुख्यमंत्री फडणवीस यांनी महाराष्ट्रात सध्या सुरू असलेल्या विविध महत्त्वाकांक्षी आणि पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांची सद्यस्थिती आणि त्यांच्या प्रगतीबाबत पंतप्रधानांना सविस्तर माहिती दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट ही नेहमीच अत्यंत प्रेरणादायी आणि सकारात्मक ऊर्जा देणारी असते, अशी भावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या भेटीनंतर व्यक्त केली.

मुख्यमंत्री फडणवीस कालपासून दिल्ली दौऱ्यावर असून केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह आणि केंद्रीय जलशक्ती मंत्री सी आर पाटील यांच्या समवेत काल ऊस आणि कांदा उत्पादकांच्या विविध प्रश्नांबाबत तसेच राज्यातील सिंचन प्रकल्प, जलजीवन मिशनची कामे आदींबाबत महत्त्वपूर्ण बैठका झाल्या आहेत.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियानाच्या परीक्षणातून वगळल्याने ग्रामस्थ संतप्त; पंचायत समितीसमोर आंदोलनाचा इशारा



**शेवगाव-** तालुक्यातील वाघोली ग्रामपंचायतीला मागील सलग तीन वर्षांपासून राज्य शासनाच्या ''माझी वसुंधरा'' अभियानात राज्यस्तरीय प्रथम पुरस्कार प्राप्त झाला असूनही, यावर्षी मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाच्या तालुकास्तरीय परीक्षणातून वगळण्यात आल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. ग्रामस्थांनी या निर्णयावर आक्षेप घेत पंचायत समिती प्रशासनाविरोधात आंदोलनाचा इशारा दिला आहे. ग्रामपंचायतीने मागील अनेक वर्षांपासून लोकसहभाग आणि श्रमदानाच्या माध्यमातून गावाच्या विकासासाठी उल्लेखनीय कार्य केले आहे. वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन, जलसंधारण, नदी खोलीकरण, स्वच्छता अभियान, सौर ऊर्जा उपक्रम, शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रातील विविध योजनांमध्ये वाघोली ग्रामपंचायतीने उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. त्यामुळे राज्यस्तरावर गावाची स्वतंत्र ओळख निर्माण झाली आहे. सलग तीन वर्षे ''माझी वसुंधरा'' अभियानात प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या वाघोली ग्रामपंचायतीला यंदा मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानासाठी संपूर्ण तयारी करूनही परीक्षण समितीकडून वगळण्यात आल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. ग्रामस्थांच्या मते, काही राजकीय हस्तक्षेप आणि चुकीच्या मूल्यमापनामुळे गावावर अन्याय झाला असून, प्रामाणिकपणे विकासकामे करणाऱ्या ग्रामस्थांचा हिरमोड झाला आहे. यासंदर्भात ग्रामस्थांनी पंचायत समिती प्रशासनाला निवेदन देत निषेध व्यक्त केला आहे. ''गावाच्या विकासासाठी दिवस-रात्र मेहनत घेणाऱ्या ग्रामस्थांच्या कार्याची दखल घेण्याऐवजी गावाला परीक्षणातून वगळणे हा अन्यायकारक निर्णय आहे,'' अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. दरम्यान, ग्रामस्थांनी शुक्रवार, दि. २९ रोजी पंचायत समिती कार्यालयासमोर सामूहिक मुंडण आंदोलन तसेच प्रतिकात्मक स्वच्छता अभियान राबवण्याचा इशारा दिला आहे. प्रशासनाने तात्काळ या प्रकरणाची चौकशी करून न्याय द्यावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे. या आंदोलनाला गावातील अनेक मान्यवर आणि ग्रामस्थांचा पाठिंबा लाभत असून, सरपंच सुष्मिता भालसिंग, उपसरपंच कल्पना भालसिंग, हिराबाई शिंगटे, राजेंद्र जमघडे, मोहन गवळी, उमेश भालसिंग, संतोष आल्हाट, रावसाहेब शिंगटे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याची माहिती समोर आली आहे. विकासकामांच्या जोरावर राज्यात वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या वाघोली ग्रामपंचायतीवर झालेल्या कथित अन्यायामुळे आता ग्रामस्थ आक्रमक झाले असून, प्रशासन यावर काय भूमिका घेणार याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## शॉर्ट सर्कीट होऊन चिंचाळा येथे घरातील कापुस पेटल्याने १८ क्विंटल कापसासह संसार ऊपयोगी साहीत्य भस्मसात



(मधुसूदन सोनवळकर /दै.धर्मयोध्दा)

**माजलगाव-** माजलगाव पासून जवळच असलेल्या चिंचाळा ता . वडवणी येथील शेतकरी यशवंत कुलकर्णी यांच्या घरी ठेवलेला कापूस अचानक विद्युत पुरवठा वाढल्या मूळे घरात शॉर्टसर्किट होऊन १८ क्विंटल कापसा सह संसार ऊपयोगीसाहीत्यभस्मसातझाले या बाबत वडवणी तहसिलला कल्पना देऊन ही ५ तासापेक्षा जास्त वेळ होऊन ही पंचनामा झाला नसल्याने नागरिकात प्रशासनाच्या कारभारा वर प्रचंड नाराजीचा सुर दिसून येत आहे या आगी ने प्रचंड पेट घेतल्याने सुमारे ८ लक्ष रुपयाचे नुकसान झाले आहे दरम्यान या अग्नितांडवाचा तात्काळ पंचनामा करून कुटुंबीयांना आर्थिक मदत दिली जावी अशी मागणी होत आहे शेतकरी बांधवांनी कापुस दीर्घकाळ घरात ठेवणे अत्यंत धोकादायक असल्याची भावना गावकऱ्यात चर्चेतून दीसून आली.

## श्री शिवाजी विधी महाविद्यालयात वीर सावरकर जयंती उत्साहात साजरी



(सिध्देश्वर गिरी /दै.धर्मयोध्दा)

**परभणी** -श्री शिवाजी विधी महाविद्यालय, परभणी येथे प्राचार्य डॉ. एम. एल. धर्मापुरीकर सर यांच्या मार्गदर्शनाखाली स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत करण्यात आले. वीर सावरकर हे महान स्वातंत्र्यसैनिक, क्रांतिकारक, साहित्यिक व समाजसुधारक होते. त्यांनी देशभक्ती, राष्ट्रप्रेम आणि सामाजिक एकात्मतेचा संदेश दिला. त्यांनी जातिभेद, अस्पृश्यता यांना विरोध करून समाजात समतेची भावना रुजविण्यासाठी कार्य केले. ''देशभक्ती हीच खरी पूजा'' या विचारातून त्यांनी तरुणांना राष्ट्रसेवेची प्रेरणा दिली. स्वातंत्र्यलढ्यातील त्यांच्या योगदानामुळे भारतीय इतिहासात त्यांचे स्थान अजरामर आहे.

कार्यक्रमात वीर सावरकर यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. प्राचार्य डॉ. एम. एल. धर्मापुरीकर , रा. से. यो. कार्यक्रमाधिकारी डॉ. आर. बी. देशमुख , प्राध्यापकेत्तर कर्मचारी तसेच राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवक उपस्थित होते.

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रकाश दादा सोळंके, सचिव सतीश भाऊ चव्हाण तसेच महाविद्यालय विकास समितीचे सन्माननीय सदस्य चंद्रशेखर नखाते, गोविंद कदम, मगदूम मोहीउद्दीन, संतोष बोबडे, ॲड. दीपक देशमुख, ॲड. अशोक शिंदे, संतोष इंगळे आदींनी वीर सावरकर जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या.

## अधिकमासात तीर्थक्षेत्रांना भेटी अर्ध्या तिकिटातच एसटी संगे तीर्थाटन योजनेला प्रतिसाद



(सचिन रायपत्रीवार/ दै.धर्मयोध्दा)

**जिंतूर-**धिकमासाच्या पवित्र महिन्यात भाविक मोठ्या संख्येने विविध तीर्थक्षेत्रांना भेट देत असतात. भाविकांची ही गर्दी आणि त्यांची सोय लक्षात घेता,राज्य मार्ग परिवहन महामंडळाने ''एसटी संगे तीर्थाटन ही विशेष योजना तीर्थाटन सुरू केली आहे. या योजनेंतर्गत भाविकांना आता अर्ध्या तिकिटात देवदर्शन घडणार असून, एसटीने या कालावधीत विशेष नियोजन केले आहे. या योजनेंतर्गत विविध तीर्थक्षेत्रांना भाविकांना भेटी देणे सोयीचे ठरत आहे.

**सवलतींचा मोठा लाभ-** एसटी प्रशासनाने महिला आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी असलेल्या सवलती अधिक प्रभावीपणे लागू केल्या आहेत. यात महिला, मुले आणि ज्येष्ठांना बसच्या तिकिटात ५० टक्के सवलत (अर्धे तिकीट) दिली जात आहे. तसेच अमृत ज्येष्ठ नागरिक योजनेनुसार ७५ वर्षांवरील नागरिकांना एसटीचा प्रवास मोफत आहे. या सवलतींमुळे अधिकमासातील तीर्थयात्रा आता अधिक सुखकर झाली आहे.

**काय आहे एसटी संगे तीर्थाटन योजना** -एसटी महामंडळाने तीर्थयात्रेला जाणाऱ्या भाविकांसाठी ही योजना सुरू केली आहे. यामध्ये महिला मंडळे, भजनी मंडळे, ज्येष्ठ नागरिकांचे गट, बचतगट किंवा ४० नागरिकांचा समूह एकत्र येऊन एसटी बस बुक करू शकतात. खासगी वाहनांच्या तुलनेत सुरक्षित आणि खिशाला परवडणारा प्रवास व्हावा, या उद्देशाने ही योजना राबवली जाते. योजनेचा लाभ कसा घ्यावा? ज्या भाविक गटांना किंवा मंडळांना या योजनेचा लाभ घ्यायचा आहे, मागणीनुसार बस उपलब्ध करून देण्याबाबत एसटीचे नियोजन पूर्ण झाले आहे. ४० प्रवासी गट त्यांना हव्या त्या मार्गावर बस उपलब्ध करून दिली जाते. '' अधिकमासात भाविकांची मोठी गर्दी लक्षात घेता एसटी महामंडळ सज्ज आहे. एसटी संगे तीर्थाटन योजनेमुळे भाविकांना सुरक्षित आणि किफायतशीर प्रवास करणे शक्य होणार आहे. ४० नागरिकांचा गट एकत्र आल्यास स्वतंत्र बसची सोय करून दिल्या जाते. प्रवाशांना सुरक्षित सेवा देण्यासाठी एसटी प्रशासन तत्पर असल्याची माहिती आनंद चव्हाण (आगार प्रमुख),स्थानक प्रमुख रामेश्वर सोनवणे,वाहतूक निरीक्षक शरद पाटील आदींनी दिले आहे.

**प्रवाशांच्या गटाला मिळणार गावात बस**–भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी जिंतूर आगाराने तीर्थक्षेत्रांसाठी विशेष वेळापत्रक आखले आहे. यामध्ये ४० जणांचा गट असल्यास त्यांना हव्या त्या मार्गावर बस उपलब्ध करून दिल्या जात असल्याची माहिती स्थानिक महामंडळ प्रशासनाने दिली आहे.

## माजलगाव येथे स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती साजरी



(मधुसूदन सोनवळकर/ दै.धर्मयोध्दा)

**माजलगाव-** आज स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची १४३ वी जयंती निमित्त माजलगाव शहरातील सावरकर प्रेमींच्या वतीने त्यांच्या प्रतिमेचे पूजन व अभिवादन करून साजरी करण्यात आली. या प्रसंगी उपस्थित भाजप राज्य परिषद सदस्य अरुणआबा राऊत, माजी नगराध्यक्ष डॉ अशोकराव तिडके, पात्रूड मंडलाध्यक्ष डॉ. अभिजीत सोळंके, नगरसेवक गटनेते दिपकमेंडके, दत्ता महाजन भास्कर शिंदे, पत्रकार विष्णू उगले,अजय राऊत,बाळासाहेब क्षिरसागर, प्रशांतजी खुरपे, रामजी शिंदे, उमेशजी जाधव, सिद्धेश्वरभाऊ राठोड, बाळूभाऊ साळवे, गिरी टेलर, गणेश मिटकरी, मीडिया पत्रकार धनंजय माने यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते

## मे - २०२६ मध्ये पशु वैद्यकिय पदवी प्राप्त विद्यार्थ्यांना ही जून मध्ये होणाऱ्या लोकसेवा आयोगाच्या परिक्षेस पात्र ठरवा-आ . धनंजय मुंडे यांची पत्राव्दारे मुख्यमंत्र्यांकडे मागणी



(मधुसूदन सोनवळकर/ दै.धर्मयोध्दा)

**परळी -** पशुधन विकास अधिकारी वर्ग १ पदासाठी तब्बल २७९५ जागेची जाहिरात २५ एप्रिल २०२५ रोजी काढली होती त्याची प्रिलीम परीक्षा येत्या ११ जून २६ रोजी होणार आहे जाहिराती मधील पात्रतेत नमूद केल्या प्रमाणे परीक्षे पुर्वी ज्यांनी पशु वैद्यकीय पदवी प्राप्त केली आहे ते परीक्षेस पात्र ठरतील असे नमुद केले असल्याने मे २०२६ मध्ये पशुवैद्यकिय पदवी प्राप्त हजारो विद्यार्थी व संघटनेनी आमदार धनंजय मुंडे यांची भेट घेत त्यांना गळ घातली होती धनंजय मुंडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व खात्याच्या मंत्री पंकजाताई मुंडे यांना तातडीने पत्र पाठवुन अशा पात्र बेरोजगार ऊमेदवारांना जून च्या लोकसेवा आयोगाकडून घेतल्या जाणाऱ्या परिक्षेसाठी संबंधीत उमेदवार हे परिक्षा होण्या पूर्वी पात्रता धारण करत असल्यामुळे आणि राजस्थान पब्लीक कमीशन ने अशा पात्रता धारकांना परीक्षेची संधी उपलब्ध करून दिली असल्याने त्याच आधारे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने ही अशा हजारो पात्रताधारकांना परिक्षेची संधी ऊपलब्ध करून द्यावी अशी मागणी आमदार धनंजय मुंडे यांनी पत्रकाव्दारे केली आहे या वर मुख्यमंत्री काय निर्णय घेतात या कडे राज्यातील हजारो पात्रताधारकांचे लक्ष लागले आहे

## भुमिअभिलेख विभागात येणार खाजगी परवानाधारक भूकरमापक



(मधुसूदन सोनवळकर/ दै.धर्मयोध्दा)

**बीड–** शासनाच्या भुमि अभिलेख विभागाचे खाजगीकरण करण्यास सुरुवात झाली आहे ग्रामिण शेतजमीन मोजणी क्षेत्र निश्चीती शासकिय प्रकल्पाला लागणारी जमीन हस्तांतर साठीची मोजणी गौन खनिज संपत्ती मोजणी इत्यादी कामे भुकरमापक यांना करावी लागतात २०२० पासून या विभागात भूकर मापक म्हणून स्थापत्य अभियांत्रिकी पदयुत्तर पदवी पदवी / पदविका या पात्रतेवर नोकरी वर लागणारांचे प्रमाण ९० ते ९५ % पर्यंत पोहचले आहे सुरुवातीस नौकरी नसल्याने ऊच्च पदवी धारक या नौकरी कडे निवड होतात परंतू कामाचे स्वरूप तुलनेत कमी वेतन श्रेणी असल्याने अल्प वेतनात काम करण्याची मानसिकता नसल्याने अन्य विभागात निघणाऱ्या जाहिराती कडे लक्ष ठेवून ६ ते ८ महीन्यात हा जॉब सोडतात त्या मुळे या विभागात भरती होऊन ही रिक्त जागांचे प्रमाण जास्त राहाते दोन वेळा भरती प्रक्रीया राबवून देखील हा रिक्त जागांचा प्रश्न कायम राहत होता व याचा परिणाम मोजणी प्रकरणे दीर्घकाळ प्रलंबीत राहील्याने शेतकरी वर्गात संताप ऊसळत होता शासनाने नुकतेच या पदाचे सेवाप्रवेश नियम पुन्हा सुधारित करून सिव्हील डीप्लोमा धारक व आय टी आय सर्वेक्षक दोन वर्ष मुदतीचा भुकरमापक पदासाठी पात्रता निश्चीत केली आहे व ही पदे सरळ सेवेने न भरता परवानाधारक खाजगी एजन्सी मार्फत जिल्हाधिकारी यांचे अध्यक्ष ते खाली नियुक्त समीतीने पात्र परवानाधारकांची त्या त्या जिल्हयात निवड करण्याची जबाबदारी या समीती कडे सोपविली आहे अशा निवडलेल्या ऊमेदवारांना छ . संभाजीनगर येथील भुमिअभिलेख प्रशिक्षण संस्थेत ३ महीने तांत्रिक मोजणी प्रशिक्षण दिले जाणार आहे व त्यानंतर प्रत्यक्ष कामासाठी त्यांना प्रत्येक तालूका भुमीअभिलेख कार्यालयाकडे एकत्रित ठोक वेतनावर मोजणीची कामे सोपवली जाणार आहेत

दैनिक धर्मयोध्दा हे पत्र मुद्रक, प्रकाशक व मालक शिंदे रामेश्वर गणपतराव यांनी प्रविण प्रिटींग प्रेस शॉप नं.१४ सुपर मार्केट, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथे छापून धर्मयोध्दा कार्यालय, विकास नगर, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथुन प्रसिध्द केले. **संपादक–शिंदे रामेश्वर गणपतराव**

DHARMA YODDHA Daily Publisher, Printer, Owner by- Shinde Rameshwar Ganpatrao, Printed at Pravin Printing press Shop No 14 Super Market Karegaon Road Parbhani 431401 (M.S) And Published Dharmayoddha Karyalaya Vikas Nagar,Karegaon Road Parbhani. 431401 (M.S) Editor By - Shinde Rameshwar Ganpatrao